# —:: अ धि सु च ना ::—

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई.
दिनांक :— /२००६.

क्रमांक :

:— ( सिनेमा व्यतिरिक्त इतर ) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा आणि पूल खेळ, पार्लर्स, संगणकीय खेळ, वास्तवाभासी खेळ ( व्हर्च्युअल रिॲलिटी गेम्स), सायबर कॅफे नेट, इंटरनेट किंवा आंतरनेट कनेक्टिव्हीटीसह खेळ, बोलींग ॲली, पत्ते खेळण्याच्या खोल्या, सोशल क्लब, स्पोर्टस (क्रिडा) क्लब, कॅबरे कार्यक्रम, डिस्को/थेक खेळ, मेळे व तमाशा यासह सार्वजनिक मनोरंजनाच्या प्रयोगांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियत्रण करणे या निर्णयाच्या सन १९६० च्या नियमावलीत दुरुस्ती करण्याच्या मसुदयाच्या अधिसुचनेच्या उत्तरात प्राप्त झालेल्या हरकती किंवा सुचना यांचा विचार करुन मुंबईचे पोलीस आयुक्त हे सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियमाचे १९५१ च्या मुबई कायदा २२ चे कलम ३३, पोटकलम(३) चे खंड (डब्ल्यु) (डब्ल्युए) व (वाय) अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन तसेच त्या बाबतीत त्यांना समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि महाराष्ट्र शासनाच्या आगाऊ मंजुरीने वरील नियमावलीत दुरुस्ती करणारी खालील नियमावली करीत आहेत; सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियमाच्या सदरहू कलम ३३ च्या पोटकलम ६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेली नियमावली अशी आहे :—

सन १९६० च्या (सिनेमाखेरीज इतर) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा आणि पूल खेळ, पार्लर्स, संगणकीय खेळ, वास्तवाभासी खेळ ( व्हर्च्युअल रिॲलिटी गेम्स), सायबर कॅफे नेट, इंटरनेट किंवा आंतरनेट कनेक्टिव्हीटीसह खेळ, बोलींग ॲली, पत्ते खेळण्याच्या खोल्या, सोशल क्लब, स्पोर्टस (क्रिडा) क्लब, कॅबरे कार्यक्रम, डिस्को/थेक खेळ, मेळे व तमाशा यासह सार्वजनिक मनोरंजनाच्या प्रयोगांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियत्रण करणे या निर्णयाच्या सन १९६० च्या नियमावलीत दुरुस्ती करणारी नियमावली खालीलप्रमाणे राहील.

१. या नियमांना (सिनेमाखेरीज इतर) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा आणि पूल खेळ, पार्लर्स व संगणकीय खेळ, वास्तवाभासी खेळ ( व्हर्च्युअल रिॲलिटी गॅम्स), सायबर कॅफे नेट, इंटरनेट किंवा आंतरनेट कनेक्टिव्हीटीसह खेळ, बोलींग ॲली, पत्ते खेळण्याच्या खोल्या, सोशल क्लब, स्पोर्टस (क्रिडा) क्लब, कॅबरे कार्यक्रम, डिस्को /थेक, खेळ, मेळे व तमाशा यासह सार्वजनिक मनोरंजनाच्या प्रयोगांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियत्रण करणे या संबंधीची २००६ (प्रथम दुरुस्ती) नियमावली असे संबोधण्यात येईल. ( व त्याचा उल्लेख यात पुढे ‘‘ मुख्य नियमावली ’’ असा करण्यात येईल. )

२. ( सिनेमा व्यतिरिक्त इतर ) सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा आणि पूल गेम, पार्लर्स, संगणकीय खेळ, वास्तवभासी खेळ ( व्हर्च्युअल रिॲलिटी गॅम्स), सायबर कॅफे नेट, इंटरनेट किंवा आंतरनेट कनेक्टिव्हीटीसह खेळ, बोलींग ॲली, पत्ते खेळण्याच्या खोल्या, सोशल क्लब, स्पोर्टस (क्रिडा) क्लब, कॅबरे कार्यक्रम, डिस्को/थेक खेळ, मेळे व तमाशा यांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियंत्रण करणे या निर्णयांची सन १९६० ची नियमावली (जिचा उल्लेख यात यापुढे ‘‘ मुख्य नियमावली ’’ असा केला आहे) यातील नियम १, पोटकलम १ यामध्ये —

(अ) ‘‘ संगणकीय खेळ ’’, ‘‘ वास्तवाभासी खेळ ’’ या शब्दांच्या ऐवजी ‘‘संगणक किंवा वास्तवाभासी खेळ’’ हा शब्द प्रयोग करण्यात येईल; आणि

(ब) ‘‘ नेट कनेक्टिव्हिटी (जोडणी) यासह खेळ ’’ हे शब्द वगळण्यात येतील.

३. मुख्य नियमावलीच्या नियम २ मधील खंड (ड — १) यामध्ये —

(अ) ‘‘ कोणत्याही साधनांनी, चालविलेले, एकतर ’’ या शब्दांच्या नंतर ‘‘ इलेक्ट्रॉनिकरितीने किंवा ’’ हे शब्द समाविष्ट करण्यात येतील;

(ब) उपखंड (२) साठी खालील मजकूर त्याऐवजी घेण्यात येईल, तो असा की, ‘‘ (२) ‘सायबर कॅफे’ म्हणजे कोणत्याही नावाने ओळखली जाणारी वाणिज्य अस्थापना किंवा इंटरनेट कियॉस्क (छोटे दुकान) जे असेल ते व ज्याचा

उद्‌देश पुढील प्रमाणे असेल :— मनोरंजन व करमणुक यासह पण तेवढयापुरते मर्यादित नसलेल्या कोणत्याही हेतुसाठी (अस्तित्वात असलेल्या किंवा अजून कार्यान्वित करावयाच्या कोणत्याही रुपात किंवा राजशिष्टाचारात) इंटरनेटपर्यंत प्रवेश करणे व त्याचा वापर करणे, इतर कोणतेही माल पुरविणे किंवा सेवा करणे याचा भाग म्हणून किंवा मोफत किंवा नि:शुल्क सर्व— सामान्य जनतेला उपलब्ध करुन देणे असा (उद्‌देश) पण ज्यात कुटुंबिय, कर्मचारी वर्ग किंवा अधिकृत कर्मचारी यांच्या पुरताच मर्यादित असलेला प्रवेश, परंतु पाहुण्यांसाठी नसेलेले कोणतेही खाजगी निवासस्थान किंवा जागा यांचा समावेश होत नसेल ( अशी अस्थापना किंवा इंटरनेट छोटी दुकाने ) यांचा समावेश होईल; आणि सायबर कॅफेला सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम (१५१ चा अधिनियम २२ ) चे कलम २(e) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे '' सार्वजनिक करमणुकीची जागा '' समजण्यात येईल.

(क) उपखंड(८) च्या नंतर खालील उपखंड वाढविण्यात येईल.

''(नऊ) इंटरनेटवर खेळले जाणरे ऑनलाईन खेळ''.

४. मुख्य नियमावलीतील नियम १०७ मध्ये ''तात्पुरत्या जागा'' या शब्दांच्या नंतर ''नियम २ च्या खंड (१) खाली व्याख्या केल्याप्रमाणे'' हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

५. मुख्य नियमावलीत नियम १०८ मध्ये —

(अ) ''एखाद्या जागेच्या अनुज्ञप्तीसाठी अर्ज करावा लागेल '' या शब्दांच्या नंतर '' सायबर कॅफे व संगणक किंवा वास्तवाभासी खेळ खेरीज सर्व करमणुकांसाठी प्रपत्र डीडी — ४ मध्ये '' हे शब्द, अक्षर व अंक, सायबर कॅफे किंवा वास्तवाभासी खेळाचे पार्लर या साठींचा अर्ज प्रपत्र डीडी—५ मध्ये करावा लागेल '' हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(ब) ''एखादे विधान'' या अक्षरांच्या व शब्दांच्याऐवजी ''आवश्यक असेल तशी माहिती'' हे शब्द घालण्यात येतील.

(क) ''असेही दर्शविते'' या शब्दाऐवजी ''पुरविणे'' या शब्द घालण्यात येईल.

६. मुख्य नियमावलीतील नियम १०८ (अ) मध्ये —

(१) खंड (अ) मध्ये —

(एक) उपखंड (१) मध्ये ''जागेवरुन सोबत'' या शब्दानंतर ''आणि स्थान'' हे शब्द गाळण्यात यावेत.

(दोन) उपखंड(८) मधील मजकूराऐवजी खालील उपखंड घालण्यात यावा :—
''(८) तळघर, पोटमजले व गच्ची मध्ये असलेल्या जागांच्या बाबतीत सन १९९१ च्या बृहन्मुंबईसाठी'' विकास नियंत्रण विनियमांप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या इमारती व संसुचना विभाग व आरोग्य विभाग यांच्याकडील 'ना—हरकत प्रमाणपत्र' अर्जदाराने सादर केले पाहिजेत.

(तीन) उपखंड (८) नंतर खालील उपखंड आणखी घातला पाहिजे :
''(e) सायबर कॅफे च्या हेतूसाठी, स्पीकरच्या किंवा म्युझिक सिस्टीम (संगीत प्रणाली) च्या कोणत्याही प्रकारच्या सिस्टिमच्या वापराच्या बाबतीत, विनिर्दिष्ठ मर्यादेमध्येच आवाजाची पातळी राखली पाहिजे आणि तिच्यामुळे त्या परिसरातील व्यक्तींना त्रास होता कामा नये.''

(२) खंड (ब) मध्ये सुरुवातीस खालील आणखीन परिच्छेद घालावा.
'' बदलती परिस्थिती व तंत्रज्ञानामधील भविष्यकालीन विकास यांना अधीन राहून जसे व जेव्हा आवश्यक असेल तसे व तेव्हा कोणतीही अन्य अट घालण्याचा हक्क अनुज्ञप्ती देणारे प्राधिकरण राखून ठेवीत आहे.''

७. मुख्य नियमावलीतील नियम १०९ ऐवजी खालील नियम बदली घेण्यात यावा.

'' १०९:जागेची अनुज्ञप्ती देणे '':—

नियम १०८ मध्ये उद्देश केलेले दस्ताऐवज व प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यावर, अनुज्ञापक प्राधिकरण ठरविल अशा अटीं व शर्तींवर व अशा निर्बधांना अधीन राहून अनुज्ञापक प्राधिकरण हे जागेची अनुज्ञप्ती अर्जदाराला देऊ शकेल. व्हिडीओ खेळ, संगणकीय किंवा वास्तवाभासी खेळ व सायबर कॅफे खेरीज सर्व मनोरंजाच्या कार्यासाठी प्रपत्र 'डी' मध्ये जागेची अनुज्ञप्ती असेल. व्हिडीओ खेळ, संगणकीय किंवा वास्तवाभासी खेळ यांच्यासाठीची जागेची अनुज्ञप्ती प्रपत्र 'डीडी—१' मध्ये असेल आणि सायबर कॅफे साठी ती प्रपत्र 'डीडी—५' मध्ये असेल, आणि अनुज्ञापन प्राधिकरणाला आवश्यक वाटतील अशा अतिरिक्त फेरफारांना त्या अनुज्ञप्ती आधीन राहतील. सार्वजनिक मनोरंजासाठी कार्यक्रम करण्याकरीता एखादी जागा योग्य आहे अशी निश्चिती करुनच अनुज्ञापक प्राधिकरण हे जागेची अनुज्ञप्ती देईल. ही अनुज्ञप्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी असेल आाणि अनुज्ञापक प्राधिकरणाकडून तिचे नुतनीकरण होण्यास आधिन राहून ती अनुज्ञप्ती पुढे चालू ठेवता येईल पण अट अशी की देण्यात आलेली विनिर्दिष्ट प्रयोगाची अनुज्ञप्ती धारण केलेली नसल्यास प्रथम डी. डी.—१ किंवा डी. डी.—२ मधील जागेची अनुज्ञप्ती धारण केल्याने नियम २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक मनोरंजानाचा कोणताही कार्यक्रम करण्याचा स्वत: अधिकार त्या अनुज्ञप्ती धारकाला प्राप्त होत नाही.

८. मुख्य नियमावलीतील नियम ११० च्या ऐवजी खालील नियम बदली घेण्यात यावा. " ११०, अनुज्ञप्ती नाकारण्याच्या अधिकार खाली नमूद केलेल्या परिस्थितीत जागेची अनुज्ञप्ती देण्याचे अनुज्ञापक प्राधिकारण नाकारू शकेल."

(अ) त्या जागेमुळे रहिवाश्यांना किंवा तेथुन येणाऱ्या—जाणाऱ्यांना अडथळा, गैरसोय, त्रास, जोखीम, धोका किंवा नुकसान होऊ शकतील किंवा राष्ट्रीय हिताची हानी होऊ शकेल किंवा कायदा व सुव्यवस्थेची समस्या उत्पन्न होऊ शकेल असे अनुज्ञापक प्राधिकरणाला वाटल्यास, अनुज्ञापक प्राधिकरणाला योग्य

वाटेल अशी चौकशी केल्यावर प्रश्नांकित जागेच्या अनुज्ञप्तीसाठी अर्ज करणारा इसम अशी अनुज्ञप्ती देण्यास लायक नाही किंवा अयोग्य आहे अशी खात्री झाल्यास.

९. मुख्य नियमावलीतील नियम ११५ मध्ये —

(एक) पोटनियम — १ मध्ये " लाभासाठी " या शब्दांच्या ऐवजी " शैक्षणिक लाभासाठी " हे शब्द बदली घालण्यात यावेत.

(दोन) पोटनियम (५) नंतर खालील आणखीज पोटनियम वाढविण्यात यावा.

(ब) " एखादया खाजगी जागेत किंवा सार्वजनिक कार्यालयात केलेले रंगभुमी प्रयोग, कार्यक्रम, प्रदर्शन, कृती किंवा देखावा इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील कोणतेही कार्य :—

पण अट अशी की त्या जागेचा वापर गैरकायेदेशीर कार्यासाठी होत नसावा.

१०. मुख्य नियमावलीतील नियम २१३ मध्ये खंड (फ) नंतर खालील खंड आणखीन वाढवुन घ्यावा.

"(ग) सायबर कॅफेसाठी जागेची अनुज्ञप्ती देण्याचें शुल्क प्रत्येक संगणकामागे दरवर्षी रूपये दोनशे पन्नास राहील. "

११. मुख्य नियमावलीतील नियम २१५ मधील पोटनियम (११) मध्ये "संगणकीय खेळ किंवा वास्तवाभासी खेळ" या शब्दांच्या ऐवजी ''संगणक किंवा वास्तवभासी खेळ" हे शब्द बदली घेण्यात यावे.

१२. मुख्य नियमावलीतील नियम २२७ मध्ये पोटनियम(३) २२१ नंतर खालील पोटनियम आणखी वाढवुन घ्यावा :—

'' (४) सायबर कॅफे, संगणक किंवा वास्तवाभासी खेळ केवळ ८.०० वाजल्यापासुन २३.०० पर्यंतच चालविता येतील. जागेच्या अनुज्ञप्ती धारकांनी प्रपत्र (एल) मध्ये ते वेळेचे निर्बंध मर्यादा दर्शविले पाहिजेत आणि बंद होण्याच्या वेळेपर्यत खेळ किंवा मनोरंजन पुर्ण करण्याची सुचना केली पाहीजे. "

# “ प्रकरण एकवीस ”

## सायबर कॅफे. संगणक किंवा वास्तवाभासी खेळाकरिता विशेष नियमावली

२४६. वैयक्तीक ओळख — (अ) सायबर कॅफेला भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने कोणतीही अधिप्रमाणित फोटो ओळखपत्रिका, पारपत्र, महाविद्यालयाचे ओळखपत्र, पॅन कार्ड, वाहन चालक अनुज्ञप्ती, कार्यालयीन ओळखपत्र वगैरे हजर करणे आवश्यक राहील.

(ब) अनुज्ञप्ती दिलेल्या प्रत्येक सायबर कॅफेने वापरण्याची प्रत्यक्ष रोजवही लिहुन ठेवणे आवश्यक राहील व त्यातील मजकूर, प्रपत्र ४ (एक) मध्ये म्हटल्याप्रमाणे, वापरणाऱ्याने स्वत: लिहीला पाहीजे.

२४७. प्रत्यक्ष मांडणी — (अ) सायबर कॅफेमध्ये संगणक वापरणाऱ्या एका व्यक्तीला संगणक वापरणाऱ्या इतर व्यक्तीं पासुन वेगळे करील (एकाकी पाडील) अशा पुर्णपणे बंदिस्त कक्षीका सायबर कॅफेमध्ये असता कामा नये.

(ब) सायबर कॅफेच्या आत कोणतेही पार्टीशन (विभाजन) बसविण्यात किंवा बांधण्यात आले असल्यास त्याची उंची जमीनीच्या पातळीपासुन साडेचार फूटापेक्षा जास्त असता कामा नये.

(क) “ संभोगदर्शनास परवानगी नाही ” असे दर्शविणारे फलक सायबर कॅफेमध्ये ठळकपणे प्रदर्शित केले पाहीजेत.

२४८. इंटरनेट राजाशिष्टाचारे वाटप / एक्सेस लॉग्स (रोजवही) पहावयास मिळणे —

(अ) इंटरनेट राजशिष्टाचाराच्या (आय.पी.च्या) पत्रांचा गट वेगवेगळया यंत्रांवर प्रत्यक्ष (परस्पर) वापरण्यात येत असेल तेव्हा कोणता इंटरनेट राजशिष्टाचार (आय.पी.) चा पत्ता कोणत्या यत्राच्या वाटयाला देण्यात आला आहे हे दर्शविणारी यादी सायबर कॅफेनी लिहुन ठेवली पाहीजे.

(ब) वेगवेगळया यंत्रांमध्ये वाटुन देण्यात आलेल्या एक किंवा बहुविध सायबर कॅफेनी अशी इलेक्ट्रॉनिक रोज वही ठेवली पाहीजे. की ज्यामुळे प्राधिकाऱ्यांनी मागणी केल्यावर, कोणत्याही विनिर्दिष्ट वेळी कोणत्या अंतर्गत लेन (एल.ए.एन.) इंटरनेट राजशिष्टाचाराच्या (आय.पी.च्या) वाटयाला कोणते यंत्र देण्यात आले होते हे प्राधिकाऱ्यांना सांगणे/कळविणे सायबर कैफेच्या मालकांना शक्य होईल.

(क) वापरणाऱ्या व्यक्तींचे रोजवहीचे अभिलेख कमीत कमी एक वर्षापर्यंत ठेवणे पाहीजेत आणि त्यांची मागणी करण्यात आल्यावर अन्वेषणाच्या हेतू साठी पोलीसां पुढे ते अभिलेख हजर केले पाहिजेत.

२४९. सायबर कॅफे ची अनुज्ञप्ती मिळण्यासाठीची पुर्वावश्यकता:— (सायबर कॅफे किंवा तशाच प्रकारच्या आस्थापनेच्या बाबतीत जागेच्या अनुज्ञप्तीसाठी असलेला अर्जाचा नमुना ) नमुना डी. डी. ५ मधील अनुक्रमांक १२ मध्ये नमुद केलेले संबध्द् दस्ताऐवज अर्जदाराने मिळवुन अर्जाला जोडणे आवश्यक आहे.

सायबर कॅफे यांनी ठेवायच्या वापरकर्त्याची रोजवहीचा नमुना
वापर कर्त्यांच्या रोजवहीचे अभिलेख :—

| अनु क्र | दिनांक | सुरवातीची वेळ | संपल्याची वेळ | सदस्यत्व / विशेष सदस्यत्व क्रमाक, काही असल्यास | वापरकर्त्याचे पुर्ण नाव / वय / लिग / राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| वापरकर्त्याचा पत्ता दुरध्वनी क्रमांक | सादर करण्यात आलेल्या छायाचित्रासहीत ओळखपत्र | वापरलेले संगणक लॅन आयडी नाव क्रमांक | उदेश्य जाळ भ्रमण वेबवर्क इमेल चॅट | वसुल झाालेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |

| सुरवातीचा संचालक / व्यवस्थापक | वापरकर्त्याची सही |
|---|---|
| १२ | १३ |

टिप :— १) सर्व वापरकर्त्यानी वरील माहिती सुरवातीस दिल्यावरच त्यांना सदस्यत्व देण्यात येइल.

२) सदस्यत्वाचा तपशील हा कायम स्वरूपी अभिलेख म्हणुन ठेवण्यात यावा आणि सदस्यत्वाचा क्रमांक अंकाक्षरी असावा. तो हार्ड कॉपीमध्ये सदस्यास सुपुर्द करावा.

३) त्यानंतरच्या भेटींच्या बाबतीत दिनांक, वेळ, व वसुल झालेली रक्कम यांच्यासह सदस्यत्वाचा अंक लिहावा/नोंदवावा आणि त्याची / तीची सही पडताळणी करून त्याची / तीची सही घेण्यात यावी.

४) वारंवार भेटीस येणाऱ्या ज्या व्यक्ती आगाऊ रक्कम जमा करतील किवा सवलतीने /संपुरक तत्वावर सेवा पुरविण्यात येत असतील त्यांना विशेष सदस्यत्व देता येईल

**( सायबर कॅफे मालकाचे /संचालकाचे नाव व सही )**

## नमुना " डी. डी. — ४"

पत्रावर टंकलिखीत करावयाचे प्रपत्र

प्रेषक :— मेसर्स .......................
.............................
.............................
.............................

जागेची अनुज्ञप्ती
कोर्ट फी स्टॅम्प

दिनांक :—

प्रति,
पोलीस आयुक्त,
कक्ष १० (चित्रपट शाखा),
बृहन्मुंबई.

विषय:— ......................................... चा कार्यक्रम करण्यासाठी जागा / खेळ करण्याचा परवाना मिळवण्यासाठी अर्ज.

महोदय,

मी, निम्न स्वाक्षरी कर्ता/कर्ती श्री/श्रीमती/कु. .......................... हॉटेल/व्हिडिओ गेम /पार्लर /व्हिडिओ थियटर्स/ क्लब / हॉल चा/ची मालक मेसर्स ...................... वरील पत्यावरील जागा मिळण्साठी / प्रयोग कार्यक्रम करण्यासाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करू इच्छितो / ते. जागाा माझ्या मालकीची आहे / भाडयाने घेतलेली आहे / भाडेपटयाने घेतलेली आहे.

त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

१) सपुर्ण नाव :—

२) व्यवसाय :—

३) वंश /पित्याचे नाव :—

४) वय (जन्मतारीख व जन्म ठिकाण) :—

५) राष्ट्रीयत्व :—

६) निवासी पत्ता व दुरध्वनी क्रमांक :—

७) (अ) आस्थापनाचे संपुर्ण नाव :—

(ब) आस्थापनानेसाठी अन्य कोणतेही
नाव वापरले आहे काय? :—

८) (अ) अर्जदाराचे जागेसाठी/प्रयोग/कार्यक्रम करण्याकरीता :—
अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी यापुर्वी अर्ज केला होता का?
केला असल्यास कोणत्या जागेसाठी आणि केव्हा?
तो मंजुर झाला किंवा नाही ?

(ब) यापुर्वी अर्जदार कोणतीही पोलीस अनुज्ञप्ती, जागेची :—
अनुज्ञप्ती धारण करीत होता का? सदरहू अनुज्ञप्ती यापुर्वी
कधीही निलंबित/रद् करण्यात/काढून घेण्यात आली होती
किंवा कसे आणि तसे असल्यास, सदरहू आदेशाच्या
प्रतीसह त्या बाबतच्या तपशील नमूद करावा.

९) मनोरंजन कार्यक्रमाचे नेमके स्वरूप :—

१०) लागू असलेल्या कागदपत्रांच्या
जोडण्यात आलेल्या प्रती :—

१) दुकाने व आस्थापना अनुज्ञप्ती.
२) खादयगृह अनुज्ञप्ती.
३) श्रैणी अनुज्ञप्ती.
४) ''नमुना ब '' मधील आरोग्य विभागाची अनुज्ञप्ती.
५) एफ.एस.तीन अनुज्ञप्ती.
६) पी.पी.ई. अनुज्ञप्ती.
७) भागीदारी पेढी असल्यास भागीदारी खताची एक प्रत.

८) जागा भाडयाने / भाडेपध्दती ने घेतली असल्यास, भाडयाची पावती.

९) कर निर्धारण / प्रदान केल्याचा पावत्या.

१०) वीज जोडण्याच्या सुरक्षिततेे संबधात शासनाच्या विदयुत कंत्राटादाराकडून घेतलेले प्रमाणपत्र.

११) सार्वजनिक सुरक्षितेतच्या दृष्टीकोनातून सर्व सावधगिरीची उपाययोजना करण्यात आली आहे. अशा आशयाचे अग्नीशमन दलाकडील दस्तऐवज.

१२) चालु वर्षातील अग्निशमन सामग्रीचे देयक.

१३) महानगर टेलीफोन निगम लिमिटेडने दिलेले दुरध्वनी चालू स्थितीत असल्याबाबतचे किंवा तो जागेत योग्यरितीने बसविण्यात आला असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

१४) १०० मीटरच्या अंतराच्या आत असलेल्या धार्मिक, शैक्षणिक संस्था व रूग्णालय दर्शविणारा स्थळ नकाशा.

१५) जागा अर्जदाराच्या मालकाची असल्यास मालकीबाबतची कागदपत्रे.

१६) महानगरपालिकेचे भोगवटा / प्रारंभीचे प्रमाणपत्र किंवा ‘‘कोणतीही कारवाई प्रलंबित नाही ” असे नमूद करण्यात आलेले महानगरपालिकेचे प्रमाणपत्र.

१७) नियमावलीची प्रत.

१८) ज्या निर्णयाखाली पोलीस विभागाकडून सदरहु अनुज्ञप्ती सही करण्यास व ते मिळवण्यास (एखादया व्यक्तीला) प्राधिकृत करण्यात आले आहे, त्या निर्णयाची प्रत.

१९) जागा पोटमजल्यावरील असल्यास, इमारत व संसूचना आणि मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेले ना—हरकत प्रमाणपत्र.

वरील कागदपत्रांच्या प्रती यासोबत जोडल्या आहेत. अन्य कोणतीही कागदपत्रे आवश्यक असल्यास ती सादर करण्याविषयी आम्हास कळविण्यात आल्यावर लगेचच ती सादर करू.

आपणास विनंती करण्यात येत आहे की आवश्यक ती अनुज्ञप्ती मंजुर करण्यात यावी. मी त्या अनुज्ञप्तीच्या शर्तीचे पालन करीन.

आपण लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करून उपकृत कराल अशी आशा आहे.

आभारी.

**आपला विश्वासू,**

.

**( संपुर्ण नाव व सही )**

रू.१५०/—

# नमुना "SS - 4"

## सायबर कॅफें किंवा तत्सम आस्थापनांच्या संबंधात जागेकरिता अनुज्ञप्ती मिळण्यासाठी अर्जाचा नमुना

कोर्ट फि स्टॅम्प

प्रेषक ———————————
———————————
———————————
———————————
दिनांक :— ———————

प्रति,
पोलीस आयुक्त,
कक्ष — १० (चित्रपट शाखा),
बृहन्मुंबई.

विषय — सार्वजनिक ठिकाणी इंटरनेट / इंटरनेट जोडणी (कनेक्टीव्हीटी) ची सेवा पुरविणाऱ्या सायबर कॅफे किंवा तत्सम आस्थापनाकरीता जोडणी अनुज्ञप्ती देण्याकरीता अर्ज.

महोदय,

मी/आम्ही खाली स्वाक्षरी करणारा/करणारे श्री/श्रीमती/कुमारी ............ ........................... सायबर कॅफे/सगंणक आणि/किंवा वास्तवाभासी खेळ (व्हच्युअल रिॲलिटी गेम) (मुंबई पोलीस अधिनियम, १९५१च्या कलम २(९) अन्वये सार्वजनिक मनोरंजनाच्या जागेची व्याख्या केल्याप्रमाणे याचा / याचे मालक, मेसर्स .. ............................................ यांच्या नावाने पुढील पत्त्यावर जागेची अनुज्ञप्ती मिळण्याकरीता अर्ज करू इच्छितो/ते. ही जागा माझ्या / आमच्या मालकिची आहे. सदरहु जागा भाडयाने/भाडे पट्टयावर/समंतीने परवानगीवर घेतलेली आहे. सविस्तरपुर्वक तपशिल पुढील प्रमाणे आहे. ( एकापेक्षा अधिक अर्जदार असल्यास, प्रत्येक अर्जदाराचा तपशिल पुरविण्यात यावा ).

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे पुर्ण नाव, अद्याअक्षरे पुर्ण लिहावीत | :— | |
| २. | व्यवसाय | :— | |
| ३. | पित्याचे / पतीचे नाव व पत्ता | :— | |
| ४. | वय (जन्मतारिख) | :— | |
| ५. | राष्ट्रीयत्व | :— | |
| ६. | मालकाचा इ—मेल पत्ता | :— | |
| ७. | (अ) सायबर कॅफेचे/अस्थापनाचे पुर्ण नाव व पत्ता | :— | |
| | (ब) दुरध्वनी क्रमांक | :— | |
| | (क) फॅक्स क्रंमाक | :— | |
| | (ड) सायबर कॅफेचा इ—मेल पत्ता | :— | |
| | (इ) सध्या किती शाखा/केंद्र अस्तित्वात आहेत? या नमुन्यानुसार त्यांचा तपशिल द्यावा.(आवश्यक असल्यास वेगळा कागद जोडावा) | :— | |
| | (फ) जागेचे अदमासे क्षेत्र | :— | |
| | (ग) प्रस्तावित टर्मिनल क्रमांक | :— | |
| ८. | (अ) सदरहु जागा अर्जदाराच्या मालकाच्या मालकीची जागा आहे,भाडेपट्टयाची आहे. भाडयाची आहे किंवा संमतीनि — परवानगी तत्वावर घेतलेली आहे किवा कसे (ते विनिर्दिष्ट करा). | :— | |
| | (ब) जर जागा भाडयाने, भाडेपट्टयावर किंवा संमती नि परवानगी या तत्वावर घेतली असेल तर भाडेदारीची/भाडेपट्टयाची संमती नि परवानगीची मुदत. | :— | |
| ९. | अ) अस्थापनेकरिता दुसऱ्या एखाद्या नावाचा वापर केला आहे का ? तसे असल्यास त्याचा तपशील द्या. | :— | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (ब) अशाच प्रकारचा अनुज्ञप्तीकरीता पुर्वी अर्ज केला होता का? तसे असल्यास तपशिल द्या. | :— | |
| १०. | दुरध्वनी ग्राहकांचे नाव व पत्त्यासह सायबर कॅफेमधील सर्व दुरध्वनी क्रमांक (आवश्यक असल्यास वेगळा कागद जोडावा) | :— | |
| ११. | अर्जदार / मालका व्यतिरिक्त अन्य कोणी व्यक्ती सायबर कॅफे चालविणार असल्यास त्या चालकाचे नाव व पत्ता | :— | |
| १२. | या अर्जासोबत जोडावयाच्या अशा अर्जदाराची स्वाक्षरी असणाऱ्या दस्ताएवजांच्या प्रती (प्रत्येक कार्यानुसार लागु असतील त्या.)<br>१. दुकाने व अस्थापना अनुज्ञप्ती.<br>२. भागीदारी पेढी असल्यास भागीदारी विलेखाची प्रत.<br>३. जागा भाडयावर/भाडेपट्टयावर असल्यास, भाडयाची पावती.<br>४. चालु वर्षात अग्निशमन साधनसामुग्रीचे देयक.<br>५. अर्जदाराची स्वत:ची मालकीची जागा असल्यास मालकीचे दस्तऐवज.<br>५. जागा निवासी असल्यास, जागेच्या मालकाचे किंवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र.<br>६. जागा निवासी असल्यास, जागेच्या मालकाचे किंवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र.<br>७. व्यवस्थापकाचे / चालकाचे / कर्मचाऱ्यांचे नाव, पत्ता व इतर तपशील सोसायटीच्या | :— | |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाममुद्रित पत्रावर स्वतंत्रपणे पुरविण्यात यावा.<br>८. अस्थापना जर का कंपनी असेल तर नियमावलीच्या ज्ञापनाची प्रत.<br>९. अर्जदारास सदरहु अनुज्ञप्तीवर स्वाक्षरी करण्यास व अनुज्ञप्ती प्राधिकरणाकडून ते प्राप्त करण्यास ज्या ठरावाव्दारे प्राधिकृत करण्यात आले त्या ठरावाची प्रत.<br>१०. आय.एस.पी.ला प्रदान केलेल्या चालु देयकाची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>११. सायबर कॅफे अनुज्ञप्ती नियमाच्या आधारे पोलीसांनी दिलेल्या सायबर कॅफेच्या अनुज्ञप्तीच्या आधारावर कोणत्याही शासकीय किंवा अशासकीय प्राधिकरणा विरूध्द् कोणत्याही स्वरूपाचा दावा कोणताही अनुज्ञप्तीधारक करणार नाही. | | |

इतर कोणतेही दस्तऐवज आवश्यक असल्यास ते आम्हांला कळविल्यानंतर लगेचच सादर करण्यात येतील. वरील दस्तऐवजाच्या प्रती या सोबत जोडलेल्या आहेत.

जागेची अनुज्ञप्ती कृपया देण्यात यावी अशी विंनती करण्यात येत आहे. अनुज्ञप्तीच्या शर्तीचे मी पालन करीन.

आभार.

आपला विश्वासु,

(पुर्ण नाव व सही)

## नमुना "SS - 2"

रक्कम रू ...............................
पावती क्र ...............................
दिनांक ...............................

**जागेची अनुज्ञप्ती**
( नियम १०९)
( फी करीता नियम २१३ पहा )
क्र. ....................................

पोलीस आयुक्त बृन्हमुंबई यांनी केलेल्या बृन्हमुंबईतील सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि कॅबरेनृत्य कार्यक्रम, डिस्को नृत्यखेळ, पूल गंम पार्लर, संगणक ,वास्तवाभासी खेळ (व्हर्च्युअल रिॲलिटी गेम्स) सायबर कॅफे, बोलींग ॲलिज, पत्तें गृह (र्काड रूम्स), सोशल क्लब, क्रीडा क्लब, मेळे व तमाशा यासहित सार्वजनिक मनोरंजनाच्या कार्यक्रमांच्या जागा यांना अनुज्ञप्ती देणे आणि त्यांचे नियंत्रण करणे. नियमावली १९६० च्या नियम १०९ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, याव्दारे पूर्वोक्त नियमांत घालून दिलेल्या अटीं व निर्बंधाच्या अधीन राहुन बृन्हमुंबई येथील आणि ................ म्युनिसिपल क्रमांकाखाली कर आकारणी करण्यात येणारी, .... .......... येथे बसलेली, मेसर्स .................................. म्हणुन ओळखली जाणारी सार्वजनिक मनोरंजनाची जागा, उपरोक्त नियमान्वये निलंबन करण्याच्या किंवा परत घेण्याच्या शर्तीस अधीन राहुन, आजच्या दिनाकापासून .................... पर्यत सकाळी ८.०० ते २३.०० या वेळात खुली ठेवण्यासाठी श्री/श्रीमती ......................... यांना अनुज्ञप्ती दिली आहे.

१) युनिटची संख्या .......................... क्रंमाक/संख्या.
२) सायबर कॅफेचे नाव व वर्णन .....................................................
आज दिनांक ................. माहे ............ सन २०० — रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| **पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई** | **पोलीस आयुक्त, अनुज्ञापक प्राधिकरण यांच्याकरीता** |

# अनुज्ञप्तीच्या अटी व निर्बंध

१. सर्व संबंधित विभागाच्या विविध अनुज्ञप्त्यांमध्ये/ना–हरकत प्रमाणपत्रांमध्ये घालून दिलेल्या सर्व शर्तींचे, विशेषत: सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीकोनातून, सर्व वेळी कटाक्षाने पालन करण्यात यावे.

२. (कार्यक्रमास) येणाऱ्या ग्राहंकाना (प्रेक्षकांना) मोकळेपणी, सुरक्षितपणे आणि अडथळयाविना ये–जा करता येण्यासाठी पुरेशा संख्येतील आत येण्याचे व बाहेर जाण्याचे दरवाजे संपुर्ण वेळ चालू स्थितीत असावेत. ध्वनिप्रदुषण नियंत्रण नियमात निर्धारित केलेल्या शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

३. त्या भागातील रहिवाशांना व सर्वसाधारणपणे जनतेला कोणत्याही प्रकारे उपद्रव होता कामा नये.

४. अनुज्ञप्तीधारकाने वाहने उभी करण्याची (पार्किंगची) आवश्यक ती व्यवस्था करावी किंवा त्यांचे ग्राहक कोणत्याही प्रकारची वाहतुकीची समस्या निर्माण करण्यास कारणीभुत होणार नाहीत किंवा त्यांची वाहने रस्त्यावर लावणार नाहीत याची निश्चिती करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग ठेवावा.

५. सार्वजनिक मनोंरजनाच्या जागा (सिनेमा व्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशा यासह सार्वजनिक मनोरंजनाच्या कार्यक्रमाच्या जागा यांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियंत्रण करणे नियमावली १९६० यांचे आणि त्यामध्ये नमुद केलेल्या शर्तीचे पालन करण्यास अनुज्ञप्तीधारक कसुर करील तर ही अनुज्ञप्ती निलंबनासाठी किंवा रद्द करण्यासाठी पात्र असेल.

६. स्थानिक रहिवाशांकडुन किंवा अभ्यांगताकडून त्यांना त्रास होत असल्याबद्दल/धोका असल्याबद्दल /जोखीम निर्माण झाली असल्याबद्दल कोणतीही तक्रार आल्यास ही अनुज्ञप्ती निंलंबीत किंवा रद्द करणे या सारखी कारवाई केली जाण्यास पात्र असेल.

७. कोणत्याही व्यक्तीस या जागेमध्ये कोणतेही मद्यासक्त (अल्कोहोलयुक्त) पेय, गरम किंवा थंड पेय किंवा अन्न पदार्थ  विकण्यास मुभा असणार नाही.

८. अनुज्ञप्ती धाराकाने कोणत्याही स्वरूपात जुगारला चालना प्रोत्साहन देता कामा नये किंवा त्याकडे कानाडोळा करता कामा नये.

९. ज्या कार्यक्रमात किंवा खेळामध्ये श्रोतृवर्गास किंवा जनतेस जोखीम, क्षती/हानी किंवा धोका पोहचु शकतो किंवा जो श्रोत्यांना किंवा अनुज्ञापन प्राधिकरणास आक्षेपार्ह वाटतो अशा कोणत्याही कार्यक्रमास किंवा खेळास अनुज्ञप्ती धारकाने परवानगी देता कामा नये.

१०. सायबर कॅफेला भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला छायाचित्रासहित ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११. अनुज्ञप्ती धारकाने नमुना एक नुसार वापर कर्त्यांची प्रत्यक्ष रोज वही सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

१२. चालु असलेल्या सर्व यंत्रांचा दर्शनी भाग '' बाहेरील '' बाजुस असावा म्हणजेच सायबर कॅफेच्या समाईक मोकळया बाजुकडे तोंड करून असावा.

१३. सायबर कॅफेच्या कक्षिका सपुंर्णपणे बंद केलेल्या नसाव्यात.

१४. पार्टीशन/कक्षिका असतील तर अशा वेळी पार्टीशनची उंची जमीनीच्या पातळी पासुन साडेचार फुटापेक्षा जास्त नसावी आणि कक्षिका वरच्या बाजुने खुल्या ठेवण्यात याव्यात आणि तात्पुरत्या किंवा अन्यथा बंद केलेल्या नसाव्यात.

१५. आयएसपीकडून इंटरनेट राजशिष्टाचार पत्त्याचा गट असलेल्या सायबर कॅफे त्यांच्या ग्रांहकांचा यंत्रावर त्यांचा थेट वापर करू शकतील. असे झाल्यास कोणत्या यंत्राला कोणता इंटरनेट राजशिष्टाचार पत्ता काढून दिले आहे हे दर्शवणारी यादी त्यांनी ठेवणे आवश्यक आहे.

१६. दुसऱ्या पक्षी, ज्यांनी इंटरनेट राजशिष्टाचार पत्ता (एक किंवा अनेक) वाटुन घेतले असतील, जे त्यानंतर एकाच वेळी कित्येक स्थानिक यंत्रावर वाटले गेले असतील, अशा सायबर कॅफेंनी " MAXCURATED " इंटरनेट राजशिष्टाचार असणारी असाधारण वास्तविक इंटरनेट राजशिष्टाचार नकाशा दर्शवणारी एक इलेक्ट्रोनिक रोजवही ठेवली पाहिजे. सायबर कॅफेच्या चौकशीच्यावेळी प्राधिकाऱ्यांडून मागणी करण्यात आल्यावर विनिर्दिष्ठवेळी कोणत्या यंत्रावर कोणत्या इंटरनेट राजशिष्टाचार पत्त्याचे वाटप केले होते हे, जोवर सायबर कॅफेंना सांगता येत असेल तोवर, यासाठी प्रत्यक्षात कुठली पध्दती वापरली जाते ही बाब अप्रस्तुत आहे.

| मालकाचे नाव व स्वाक्षरी | व्यवस्थापकाचे नाव व स्वाक्षरी |
|---|---|
| | |

अनुज्ञप्तीमधील निर्देशित शर्तीना आधीन राहुन वरील अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणाचे ज्ञापन.

| नुतनीकरणाचा दिनांक | नुतनीकरण केलेल्या अनुज्ञप्तीच्या समाप्तीचा दिंनाक | अनुज्ञापक प्राधिकांऱ्याची सही |
|---|---|---|
| | | |

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई.